# स्नेहबंध

मराठी भाषिक मंडळ, टोरांटो इन्क.
*Marathi Bhashik Mandal, Toronto Inc.*

वर्ष २१वे अंक चौथा | संपादन : सौ. नीता टिळक | ५ ऑक्टोबर १९९२ 'दसरा'



## दीपावली व नूतन वर्षाच्या आगमन प्रसंगी आमच्या शुभेच्छा



## मराठी भाषिक मंडळाची कार्यकारिणी व सल्लागार समितीतर्फे वाचकांचे हार्दिक

# दीपावली शुभचिंतन

"यंदाची दीपावली साजरी करण्याआधी असं लक्षात येतं आहे की, १९९१ च्या प्रारंभापासून लागलेली आर्थिक मंदीच्या ग्रहणाची पकड अधिकाधिक आवळू लागली आहे.. परंतू तज्ञांच्या अंदाजानुसार १९९२ च्या नोव्हेंबरात होणाऱ्या अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकांनंतर हे ग्रहण हळूहळू उलगडायला लागावे! त्यामुळे १९९३ सालाकडे आता अपेक्षेने बघायला लागू या.

१९९३ साली आपल्या मंडळाचा रौप्यमहोत्सव साजरा होणार आहे. '२५ वर्षे उत्तर अमेरिकेतील एका मोठ्या शहरातले मराठी मंडळाचे अभंग अस्तित्व' ही वस्तुस्थिती अभिमानाने साजरी करण्यासारखी आहे. टोरांटो आणि आसपासच्या किमान १५० कि. मीटर्स परिघातील मराठी भाषिकांची सांस्कृतिक व सामाजिक गरज भागविण्यासाठी आपले मंडळ गेले पाव शतक उभे आहे. असंख्य निरपेक्ष कार्यकर्त्यांच्या मदतीने हा 'जगन्नाथाचा रथ' असाच जोमाने पुढे वाटचाल करीत राहील ह्यात शंकाच नाही.

ह्या रौप्यमहोत्सवाची सिद्धता करण्यासाठी माजी अध्यक्षांची एक समिती यंदा स्थापन झाली असून तिचे कार्य उत्साहाने सुरू झाले आहे. पण फक्त हे माजी अध्यक्षच नव्हेत तर अगणित हितचिंतकांचा हातभार लागून हा रौप्यमहोत्सव यशस्वी होणार आहे. कारण हा आपल्या सर्वांचा आणि सर्वांसाठी साजरा होत असलेला महोत्सव आहे!

गेल्या २५ वर्षांचा आढावा घेतला तर असं लक्षात येईल की मंडळानं विविधांगी कार्य केलं.. पुढच्या पिढी-साठी भक्कम पाया घालून ठेवला. आता ह्या नवीन पिढीच्या हातात हात मिसळून पुढील पाव शतकाची वाटचाल सुरू करायची आहे. शुभास्ते पंथानः सन्तु!!

सौ. दुर्गा पाच्छापूरकर


**PROXIMITY AND GOOD FOOD MAKES DINNING OUT ENJOYABLE**

NOW IN SCARBOROUGH

(With Ample Parking Lots)



MADRAS PALACE


Dellicious South Indian Vegetarian & Non Vegetarian

**Our Specialites**

IDDLY, MASALA DOSA & TRADITIONAL VEGETARIAN THALIS, BIRIYANI & BUSINESS LUNCHES

*Excellant Catering Services*

**CONTACT:**
SHANTHA OR PURUSOTHAM
(416) 759-5400



Take out our Best Dishes

OPEN

TUESDAY TO THURSDAY
11:30 A.M TO 11:30 P.M
FRIDAY, SATURDAY & SUNDAY
11:30 A.M TO 12:00 MIDNIGHT

1249 ELLESMERE ROAD.
SCARBOROUGH, ONT
M1P-2X8
(Midland & Ellesmere)


## ★ ANNOUNCEMENT ★

## ★ MANDAL CONSTITUTION ★

The following topics are being considered for amendment:

1. President's voting power;
2. Mandal Investment Policy; and
3. Executive Committee: two-year term, with half the members retiring each year.

The General Body is invited to make suggestions/comments, preferably in writing, to:

Mr. Shashi Joshi (497-5193)
or
Mr. Bhaskar Pawagi (447-7379)

Amending Resolutions will be defined at the next Executive Committe Meeting and will be presented at the next General Body Meeting.




**नांदा सौख्यभरे:** टोरांटोतील श्री. विष्णू व सौ. वीणा जोशी यांची कन्या **नीता** (स्नेहबंधाची यंदाची संपादिका) आणि मंडळाचे माजी अध्यक्षद्वय डॉ. केशव व सौ. मंदा टिळक यांचा पुत्र **शशांक** यांचा शुभविवाह २२ ऑगस्ट रोजी टोरांटोत मोठ्या थाटात साजरा झाला. वधुवरांना शुभाशिर्वाद देण्यासाठी अनेक आप्तेष्ट व इष्टमित्र या मंगलप्रसंगी उपस्थित होते. नवदांपत्याचे हार्दिक अभिनंदन!

**अभिनंदन!** टोरांटोतील श्री. सुहास व सौ. सुजाता अंबिके यांचा मुलगा **सचीन** हा यंदा ९७% मार्कस् मिळवून टोरांटो युनिव्हर्सिटीच्या इंजिनिअरिंगला दुसरा आला (इलेक्ट्रिकलला पहिला). सचीनने W.S. WILSON MEDAL, F.C.C.P. ची JOHN HIN SHUNG SCHOLARSHIP आणि J.E. REID MEMORIAL PRIZE अशी तीन पारितोषिके पटकावली! त्याचे करावे तेवढे कौतुक अपुरेच आहे!

**सहल:** वरूणराजाच्या अवकृपेमुळे १८ जुलै ऐवजी २५ जुलैला 'राऊनट्री पार्क'मध्ये झालेली मंडळाची वार्षिक सहल सुमारे २००-२२५ आबालवृद्धांच्या उपस्थितीत चांगली पार पडली. सौ. सुनंदा जोशी व सहकाऱ्यांनी बनविलेली चटकदार भेळ, मुलांसाठी हॉट-डॉग्ज आणि नेहमी प्रमाणेच कणसे व कलिंगडे यांचा समाचार घेण्यात आला. लहान मुलांसाठी मित्रत्वाच्या स्पर्धाही झाल्या.

**दिलगिरी:** "यंदाच्या गणेशोत्सवात काही व्यक्तींची पुष्कळ मदत होऊनही त्यांचे जाहीर आभार मानायचे राहिले." त्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष श्री. जोशी हे खेद व्यक्त करीत आहेत. त्या व्यक्तींची नावे – सौ. दुर्गा पाच्छापूरकर, श्री. बाळ जोशी.. आणि युवकांपैकी

(पृष्ठ ६ वर पहा)

**JACK'S**

ELECTRICAL/ELECTRONICS SERVICE

• Home Appliances • Stereos • VCRs & TVs

**VCR/Camcorder Tune-up Special:**
- Clean & demagnetize the head
- Clean & align the tape track
- Check the drum/capstan servo
- Check the video response

$32.99
(Parts extra)

AUTHORIZED SERVICE CENTRE FOR PHILLIPS DOMESTIC APPLIANCES & PERSONAL CARE PRODUCTS

PICKUP & DELIVERY FOR A NOMINAL CHARGE !

**JACK'S ELECTRICAL/ELECTRONICS SERVICE CENTRE**

145 ANGUS DRIVE, WILLOWDALE
M2J 2W9
(416) 496-6278

रत्नाकर व सुनीला नारळे ह्यांचे

**NATURAL FOODS and INDIAN GROCERIES**

For
Complete Indian Vegeterian
Grocery Needs

&

**MARATHI**
Specialties

134 Doncaster Ave, Unit 1, Thornhill.
771 8911

# दीपावली १९९२

## २४ ऑक्टोबर १९९२ शनिवार

'चारचौघी' हे सध्या महाराष्ट्रात गाजत असलेले ३ अंकी सामाजिक नाटक टोरांटोतील हौशी कलाकार दीपावलीच्या कार्यक्रमात सादर करणार आहेत. एका जगावेगळ्याच समस्येवर आधारित अशा या नाटकात ३ युवा कलाकारांचा सहभाग आहे हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते...!

### • प्रवेशमूल्य •

सभासद ........> १० डॉलर्स
मुले (४ ते १२ वर्षे) --> ५ डॉलर्स

पाहुणे ..........> १५ डॉलर्स
मुले (४ ते १२ वर्षे) ...> ७ डॉलर्स


(सीनीअर्सना कमी दर नाही हे खेदपूर्वक सांगावे लागते आहे.)

### • कार्यक्रम •

१॥ ते २॥ नांवनोंदणी,
३ ते ६ 'चारचौघी'
६॥ ते ८॥ सहभोजन व भेटीगाठी

### • कार्यक्रमस्थळ • (नेहमीचेच!)

DOWNSVIEW SECONDARY SCHOOL *
NORTH YORK, ONT




### — विशेष सूचना —

1) हॉलवर बालसंगोपनाची व्यवस्था आहे. तरीही लहान मुलांना लागणाऱ्या त्यांच्या 'आवडत्या वस्तू' जवळ ठेवल्यास तर बरे होईल.
2) रांगोळी, हस्तकला-कुसर याचे छोटेसे प्रदर्शन हॉलभर भरणार असून त्यात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी शशी जोशी (अध्यक्ष) ह्यांच्याशी संपर्क साधावा. 497-5193
3) भोजनव्यवस्था व कार्यक्रम ह्यासाठी R.S.V.P. ची जरूरी आहे. १८ ऑक्टोबरपर्यंत आपली नावे कृपया कार्यकारिणीतील कोणत्याही सभासदास कळवावीत. फोन नंबर्स पहिल्या स्नेहबंधात आहेतच.

## —वार्षिक सभा व ख्रिसमस पार्टी—

मंडळाची वार्षिक सभा आणि मुलांसाठी ख्रिसमस पार्टी दरवर्षीप्रमाणे एकाच दिवशी म्हणजे १९ डिसेंबर १९९२ रोजी ORIOLE COMMUNITY CENTRE (DON MILLS RD., NORTH OF SHEPPARD AVE.) येथे दुपारी ३ वाजता भरणार असून आपण बहुसंख्येने हजर रहावे ही विनंती. पुढील वर्षाच्या कार्यकारिणीतील सर्व जागा व सल्लागार समितीतील एक जागा भरायची असून इच्छुक व्यक्तींनी कृपया खालील मंडळींना फोन करून इच्छा दर्शवावी.

डॉ. अर्चना बापट 226-1350 | श्री. बाळ जोशी 445-7526
श्री. आत्माराम चौधरी 438-1566 | श्री. सदा साने 445-5361
श्री. हेमंत कंदळगावकर 793-7965

ही सर्वसाधारण सभा आहे हे लक्षात घेऊन मंडळाच्या भविष्यातील कारभाराबद्दलच्या आपल्या शंका, मते व्यक्त करण्यासाठी जरूर या.

—आपली कार्यकारिणी

## मराठी भाषिक मंडळ

### ब्रिज क्लब

गेले दोन तीन वर्षांप्रमाणे ११ जुलैला श्री. साने व श्री. पावगी यांच्या कॉटेजेसवर ब्रिज खेळले गेले. मंडळी शुक्रवारपासूनच तेथे जमली होती. बोटींग, पोहणे, पत्ते व चालणे असे सर्व करून मंडळी दोन दिवस मजेत रंगली. विशेष म्हणजे ह्या वर्षी ऑटवाचे श्री. सहस्रबुद्धे यांचे प्रवचन व नंतर चर्चा झाली. शनिवारी संध्याकाळी सौ. पावगी यांनी मुख्य मेजवानीचा बेत सुरेख आखला होता. शेवटच्या दिवशी आईस्क्रीमचा बेत करून मंडळी घरी परतली.

दुसरे विशेष म्हणजे २५ सप्टेंबरच्या टोरांटो-डेट्रॉईट ब्रिजच्या सामन्यात एका बाजूला विकास कुलकर्णी व सुजीत सन्याल यांना पहिले व दुसऱ्या बाजूला डॉ. पेन व पुष्पा मुळगुंद यांना दुसऱ्या नंबरचे बक्षीस मिळाले. Congratulations!!

—सौ. मंदा टिळक

## MARATHI BHASHIK MANDAL, TORONTO (INC.)

## BALANCE SHEET AS AT DECEMBER 31, 1991

| | 1991 | 1990 |
|---|---|---|
| **ASSETS** | | |
| CASH IN BANK | 369.74 | 1,457.97 |
| INVESTMENT IN MONEY MARKET FUND | 10,549.49 | 8,589.51 |
| INVESTMENT IN MORTGAGE FUND | 18,849.65 | 0.00 |
| INVESTMENT IN BOND FUND | 19,430.89 | 0.00 |
| INVESTMENT IN G.I.C. | 0.00 | 34,000.00 |
| ACCRUED INTEREST | 0.00 | 2,276.81 |
| BOOK INVENTORY | 212.50 | 212.50 |
| PREPAID EXPENSES | 355.03 | 0.00 |
| SUNDRY RECEIVABLES | 816.48 | 80.00 |
| TOTAL | 50,583.78 | 46,616.79 |
| **LIABILITIES AND RESERVES** | | |
| ACCOUNTS PAYABLE | 0.00 | 20.00 |
| SCHOOL RESERVE | 3,654.82 | 3,718.82 |
| STUDENT ACHIEVEMENTS RESERVE | 862.90 | 862.90 |
| MEMBERSHIP FEES | 0.00 | 0.00 |
| | 4,517.72 | 4,601.72 |
| **GENERAL RESERVE** | | |
| BEGINNING BALANCE | 42,015.07 | 35,264.01 |
| ADDITIONS DURING THE YEAR | 4,050.99 | 6,751.06 |
| | 46,066.06 | 42,015.07 |
| TOTAL | 50,583.78 | 46,616.79 |

TORONTO
JULY 20, 1992

PRESIDENT TREASURER AUDITOR

(... पृष्ठ २ वरून)

चि. नितीन मनोहर व राजेश गोरवले. अनवधानाने हे राहून गेले – क्षमस्व!

**उल्लेखनीय:** आपल्या सर्वांच्या चांगल्या माहितीतल्या रवी वकील ह्या दैदिप्यमान युवकाच्या यशोगाथेत आणखी एक भर पडली आहे. सुविख्यात हॉर्वर्ड युनिव्हर्सिटीत त्याला स्कॉलरशिपसह डॉक्टरेट करण्यासाठी पाचारण करण्यात आले! ●

● टोरांटोतील डॉ. माधव व सौ. सुशीला हेबळे यांची कन्या **सुचेता** हिने यंदा 'Sociolinguistic Aspects of Code Switching (with illustrations from the Toronto MARATHI Community)' ह्या विषयावर प्रबंध लिहून टोरांटो विद्यापीठातून मास्टर्स पदवी प्राप्त केली. ●

● गेली १७ वर्षे निरलसपणे किचनर-वॉटर्लू हॉस्पिटलमध्ये उत्कृष्टपणे स्वयंसेविकेचे काम केल्याबद्दल श्रीमती **सुजाता एळाजा** यांचा हॉस्पिटलतर्फे सुवर्णपिन व सर्टिफिकेट देऊन सन्मान करण्यात आला.

## शोकसमाचार

▲ १२ ऑगस्ट १९९२ रोजी टोरांटोतील जुने रहिवासी **कुंजविहारी हिवाळे** ख्रिस्तवासी झाले. अवघ्या पन्नाशीतच कालवश झालेल्या हिवाळ्यांच्या अंत्यसंस्कारास अनेकांनी उपस्थित राहून खेद व्यक्त केला. त्यांच्यामागे पत्नी मालिनी व माया आणि जया या दोन कन्या आहेत.

▲ ९ सप्टेंबर रोजी सेंट कॅथरिन्सचे विख्यात स्त्रीरोग तज्ञ डॉ. **शंकर ऊर्फ उल्हास नाडकर्णी** यांचे अकस्मात निधन झाले. त्यांच्यामागे त्यांची पत्नी डॉ. शैला व कन्या नंदना आहेत.

▲ वॉटर्लू (ऑंटेरिओ) येथील रहिवासी व मंडळाचे जुने सभासद **प्रा. शंकर एळाजा** यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने एकाएकी निधन झाले. विल्फ्रेड लॉरिए युनिव्हर्सिटीत ते प्राध्यापक होते. त्यांच्यामागे पत्नी सुजाता, पुत्र अधीर व कन्या प्रीती आहेत.

**सर्व कुटुंबियांच्या दुःखात मंडळ सहभागी आहे.**




# SONALI'S

*IF IT IS SAREES...*

1415 Gerrard St. E.
Toronto
Ontario
(416) 466 2001

181 Main St. W.
Hamilton
Ontario
(416) 527 3707

62 Wylie Ave.
Ottawa
Ontario
(613) 721 0318


## आपल्या माहितीसाठी!

'कॅनडाच्या १९९१-च्या शिरगणतीनुसार मराठी मातृभाषा असणाऱ्यांची संख्या 1125 आहे! एकूण इंडियन ओरिजिनच्या लोकसंख्येच्या 0.5% ही संख्या भरते. त्या पैकी ७०० लोकं ऑंटेरियो प्रांतात रहातात.'

– श्री. शाम नाडकर्णींच्या सौजन्याने.

मराठी पद्धतीचे स्वादिष्ट अन्न!
..खास वैशिष्ट्य!

Cholesterol free कॉर्न/कनोला तेलात
कॅलरींचा अभ्यास करून बनविलेले
चमचमीत, खुसखुशीत खाद्यपदार्थ!!!

ताजे, चवदार अन्न, माफक दरात!
पक्वान्ने, समारंभ-सणासुदीचे जेवण
घरपोच पोहोचवणारी...

-प्रवीणा काळे-
793-8064

आपुलकी अन् जिव्हाळ्याची सर्व्हिस!!
छोटी-मोठी फराळ, जेवणाची ऑर्डर
स्विकारू..! हसतमुख मैत्रीची सर्व्हिस!!

## भाद्रपदी येती गौरी गणपती घरोघरी!

घरोघरी नाही तरी टोरांटोच्या मराठी मंडळात गणेशपूजेचा सोहळा ५ सप्टेंबर ९२ ला मोठ्या उत्साहात साजरा झाला! शशांक व नीला टिळक ह्या नवदांपत्याने श्री. विश्वनाथ कुलकर्णींच्या पौरोहित्याखाली मनोभावे गणेशपूजन केले. नवे मखर व आरास श्री. नंदकुमार ठकारांनी सुरेख केली होती. आरत्यांच्या गजरात गणरायाची स्थापना झाल्यानंतर उपस्थितांनी आनंदबाजारातील चटकदार खाद्यपदार्थांचा समाचार घेतला.

मग झाला विविधगुणदर्शनाचा बहारदार कार्यक्रम! कार्यक्रमात भरपूर विविधता होती. कु. जोगळेकरने नृत्यात गणेशवंदना केली.. कु. सुनील बापट याने अस्खलित पाठांतरासह अथर्वशीर्ष म्हटले. टाळ्यांच्या गजराने त्याचे सार्थ कौतुक केले गेले.. सौ. चंदा स्थानकिया, सौ. शिवरंजनी कांदळगावकर, श्री. मुरकुटे, ढेकणेभगिनी, नवी कलाकार तोरसेकर यांनी उत्तम सुगम संगीत सादर केले. त्यांना वाद्यांची साथ केली होती विश्वास ढेकणे व विलास कुलकर्णी या दोघांनी... मानसी भन्साळी व सीमा खांडेकर यांनी कथ्थक नृत्यप्रकार सादर केले.. छोट्या शालिनी कुलकर्णीचा एका मराठी गाण्यावरचा नाच आणि कु. जकातेचा 'नाच रे मोरा' गाण्यावरचा नाच याला सर्वांनीच

(..पृष्ठ ८ वर पहा)

# PROFESSIONAL/BUSINESS DIRECTORY

**Dr. Girish Hattay** *Dentist*
701 Rossland Road East, Suite 207
Whitby, Ontario. L1N 8Y9
(416) 666-0244
OR
Malvern Town Centre Dental Office
31 Tapscott Road,
Scarborough, Ontario. M1B 4Y7
(416) 297-5513

■

**Mr. Srikrisna Joshi**
*Jack's Electrical/Electronic Services*
145 Angus Drive,
Willowdale, Ontario.
(416) 496-6278

■

**Mr. Sharad Kattakar** *Consulting Engineer*
Residential & commercial design; renovations;
foundation problems; additions, etc.
(416) 479-2096 (Business)
(416) 479-4632 (Residence)

■

**Mr. Ajit Kukade**
*Academy of Defensive Driving*
868 Markham Road, Suite 103
Scarborough, Ontario.
(416) 293-0786 or 289-7186

■

**Mr. Vasant Pachapurkar** *Financial Planner*
304 The East Mall, Suite 604
Islington, Ontario. M9B 6E2
(416) 236-2564 (Business)
(416) 626-0006 (Residence)

■

**Mr. Sada Sane** *Architectural & Urban Planning Consultant & Advisor to the Sign Industry*
(416) 445-5361

■

**Dr. Nita Tilak** *Dentist*
10 Gateway Boulevard, Suite R-175
Don Mills, Ontario. M3C 3A1
(416) 421-5110
OR
600 Sherbourne Street, Suite 702
Toronto, Ontario. M4X 1W4
(416) 961-6726

■

**Dr. Ashok Wardekar** *Internist/Cardiologist*
(416) 515-7800

(पान १० वरून)

ठेका धरला... सौ. अनु अंबुर्ले यांनी बसवलेले (कॅरव्हान-मध्ये सादर केलेले) लावणीनृत्य बघायची संधी मिळाली. यामध्ये कु. शिल्पा व मानसी भन्साळी, पूजा सहस्त्रबुद्धे, नंदिता जुन्नरकर व प्राची अशर ह्या मुलींनी अनुबरोबर उत्तम नृत्य केले. डॉ. अशोक वारदेकर यांनी इंग्रजी शब्दांचे अट्टाहासाने केलेले हिंदीकरण कसे हास्यास्पद होऊ शकते हे म्हणून दाखवून करमणूक केली.

गणपतीच्या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे मिसिसागाच्या मराठी शाळेच्या मुलांनी सादर केलेले "चल रे भोपळ्या.." हे नाटुकले. आश्विन गांधी, संजय जुन्नरकर, ऋतुराज दामले, निषाद कुलकर्णी, केदार आणि निशा पाटील, समीर व स्नेहा बिदनूर, तेजस काळे, मानसी नवरे, निखील कुलकर्णी, सुनील बापट व प्राची आशर ह्या बालगोपाळांच्या ओसंडत्या उत्साहातून साकारलेले हे नाटुकले रंगले व प्रेक्षकांच्या कौतुकाची पावती घेऊन गेले. ह्यामागे शाळेच्या शिक्षिका सौ. मंगला जुन्नरकरांचे दिग्दर्शन, सौ. आशा आशरचे संगीतनियोजन, सौ. मीना गांधी व सौ. शैला कुलकर्णींचे नेपथ्य व पालकांची मदत उभी होती.

उत्तरपूजेची खिरापत व आंब्याच्या डाळीची चव तोंडात घोळवत मंडळी समाधानाने घरच्या वाटेला लागली. कार्यक्रम यशस्वी होण्यात सर्वांचाच हातभार लागला. जर कोणाचा नामनिर्देश राहिला असेल तर क्षमस्व!

— ज्योत्स्ना ओगले.

## बालचमूचा विक्रमी कार्यक्रम!

— सौ. प्रवीणा काळे

५ जुलैची सोनेरी संध्याकाळ! यॉर्कवुड लायब्ररीत छोट्या कलाकारांच्या उत्साहाला उधाण आलेले होते. रौप्यमहोत्सव निधीला काही चिमुकल्या हातांची ओंजळ अर्पण होणार होती. प्रमुख कलाकार स्मिता कामत धवल वेषात स्टेजवर आली. गणरायाला वंदन होऊन समुहगीत जोषात गाईले गेले. नंतर स्मिताने तिच्या भावपूर्ण आवाजात एकामागून एक सहा गाणी सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. संपदा कुकडेने "घनश्याम सुंदरा" फार मधुरतेने सादर केले. सीमा कुलकर्णीचे कथ्थक तसेच छोट्या शालिनी कुलकर्णीचा नाच, संपदा कुकडे व कांचन भिडेची हालचालींची चपळता वाखाणण्याजोगी होती. पूजा सहस्त्रबुध्दे, गिरीजा टेकणे, अश्विन बापट, गिरीश धारवाडकर, सीमा कामत, अमित सहस्त्रबुध्दे ह्यांनी सुरेल आवाजात गीते सादर केली. स्मिताच्या "गगन सदन" ने सभागृह भारावले तर "प्रेरणीच्या देवाला" सर्वांनी ठेका धरला. "मेंदीच्या पानावर" तिने वेगळ्याच नजाकतीने गाईले. संपदा कुकडेच्या सुरेल भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली.

श्री. शरद काळे ह्यांच्या नेतृत्त्वाने झालेल्या कार्यक्रमाला श्री. विलास व सौ. मीना कुलकर्णी तसेच श्री. नरेंद्र दातार व श्री. विश्वास टेकणे यांनी साथ केली. सोनिया प्रधानने मोजक्या शब्दात सूत्रधाराचे काम पार पाडले. मोनिका पत्कीने आभाराची गोड कामगिरी केली. मध्यन्तरात प्रवीणा व प्रमोद काळे ह्यांनी विनामूल्य उपाहार दिला. रौप्यमहोत्सव समितीने बालकलाकारांना टीशर्टस देऊन सर्वांतर्फे कौतुक केले!




Refinement, elegance, thoughtful hospitality and fine dining
The creation of a cuisine touched by a rare distinction
A name that sets standards that others
are measured against

THE
MOGHUL

"INDIAN CURRY HOUSE"
BECAUSE YOU DESERVE THE BEST THAT INDIAN CUISINE HAS TO OFFER


MOGHUL ROOM
563 Bloor St. West
Toronto, Ontario
535-3315 (Bloor & Bathurst)

MOGHUL DOWNTOWN
33 Elm Street
Toronto, Ontario
597-0522 (Bay & Elm)

MOGHUL CLUB
415 Hood Road
Markham, Ontario
475-5870 (Warden & Steeles)

(Luncheon Buffet – Moghul Downtown - Moghul Club)

COMPLETE BANQUET FACILITIES FOR WEDDINGS & SOCIAL FUNCTIONS
FROM 20 TO 500 PEOPLE
HOME CATERING



# diwali greetings

*to*
*our Subscribers*
*&*
*Advertisers*